वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज ™




नाशिक फाटा-खेड महामार्ग भूसंपादनासाठी निधी द्या!

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 28 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## तब्बल 'दीड कोटीं'ना विकला जाणार होता पेपर; ३ आरोपी गजाआड

# टीईटीचा पेपर फुटला!





**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २८ जून रोजी होणारी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) २०२६ प्रश्नपत्रिका फुटल्याच्या संशयावरून पुढे ढकलण्यात आल्यानंतर या प्रकरणात मोठी माहिती समोर आली आहे. टीईटी परीक्षेचा पेपर तब्बल दीड कोटी रुपयांना विकला जाणार होता, अशी धक्कादायक माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक दुधे यांनी भिवंडी येथे पत्रकार परिषदेत दिली. या प्रकरणी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना भिवंडीतील कोनगाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने जारी केलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार, उद्या २८ जून रोजी राज्यभर एकूण १,०२८ परीक्षा केंद्रांवर टीईटी परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. नुकत्याच देशभर गाजलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणानंतर परिषदेने सुरक्षेच्या दृष्टीने विशेष उपाययोजना केल्याचा दावा केला होता. मात्र, परीक्षा होण्याच्या काही तासांपूर्वीच मिळालेल्या गोपनीय माहितीमुळे संपूर्ण यंत्रणा सतर्क झाली. याची माहिती देण्यासाठी भिवंडी येथे अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली आहे.

अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक दुधे यांनी सांगितले की, ताब्यात घेण्यात आलेल्या तीन आरोपींपैकी एक आरोपी हरियाणाचा तर दोन आरोपी बिहारचे रहिवासी आहेत. हे तिघेही दिल्लीहून महाराष्ट्रात आले होते. प्राथमिक तपासात त्यांनी टीईटीची प्रश्नपत्रिका विक्रीसाठी आणल्याचे समोर आले असून, त्यासाठी दीड कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. मात्र हा व्यवहार पूर्ण होण्यापूर्वीच पोलिसांनी कारवाई करत आरोपींना जेरबंद केले. या कारवाईदरम्यान संशयितांकडून प्रश्नपत्रिकेशी संबंधित कागदपत्रे आणि साहित्य जप्त करण्यात आले आहे. प्रश्नपत्रिका नेमकी कुठून मिळाली, ती कोणाकडून आरोपींपर्यंत पोहोचली आणि ती नेमकी कोणाला विकली जाणार होती, याचा सध्या सखोल तपास सुरू असल्याचे दुधे यांनी सांगितले.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेला भिवंडी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न आरोपींकडे असलेल्या मजकुराशी जुळत असल्याचे प्राथमिक पडताळणीत समोर आले. त्यानंतर परीक्षेची पारदर्शकता कायम राखण्यासाठी २८ जूनची टीईटी परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. नीट पेपरफुटी प्रकरणानंतरही परीक्षा सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता टीईटी पेपरफुटीमुळे राज्यातील परीक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणामागील संपूर्ण रॅकेट उघडकीस आणण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून, येत्या काही दिवसांत आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




## २० पोलिसांचे विशेष पथक (SIT) तैनात

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी २० पोलिस कर्मचाऱ्यांचे विशेष तपास पथक नियुक्त करण्यात आले असून, विविध राज्यांमध्ये तपासासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू असून, तो हाती लागल्यानंतर संपूर्ण रॅकेटचा उलगडा होईल, असे पोलिसांनी सांगितले आहे. याशिवाय आरोपींचे कोचिंग क्लासेस, परीक्षा एजंट किंवा इतर कोणत्याही रॅकेटशी संबंध आहेत का, याचाही तपास सुरू आहे. प्रश्नपत्रिका आणखी कुठे पोहोचली आहे का, किती उमेदवारांपर्यंत ती पोहोचली आणि या कटात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

# पुणे महापालिकेतून 'हार्ड डिस्क' चोरी!

## नागरिकांच्या संवेदनशील माहितीची सुरक्षा धोक्यात; कारवाईची मागणी

**महाईन्यूज । पुणे**

**'महापालिकेच्या सर्व्हर रूममधून मिळकत कर विभागाशी संबंधित माहिती असलेली हार्ड डिस्क चोरीला गेल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. गेल्या महिन्यात महापालिकेच्या सर्व्हर रूम मधून एक हार्ड डिस्क गायब झाल्याचे समोर आले होते. सर्व्हर रूम मधील हार्ड डिस्क चोरीला गेल्याचे समोर आल्यानंतर खडबडून जागे झालेल्या महापालिका प्रशासनाने त्याची चौकशी सुरू केली. सर्व्हर रूमच्या आजूबाजूला सुरक्षिततेसाठी लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली असता ज्या कर्मचाऱ्याकडे सर्व्हर रूमच्या दुरुस्तीची जबाबदारी होती. त्यातील एका व्यक्तीने ही हार्ड डिस्क गायब केल्याचे दिसून आले. हा कर्मचारी ठेकेदारामार्फत महापालिकेच्या सेवेत काम करत होता.**




संबंधित व्यक्तीने सर्व्हर रूम मधील हार्ड डिस्क चोरून घरी नेल्यानंतर १५ दिवसानंतर महापालिका प्रशासनाच्या लक्षात ही गोष्ट आली. सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे चित्रीकरण पाहिल्यानंतर त्या व्यक्तीला बोलावून त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर त्याने वैयक्तिक कारणासाठी हार्ड डिस्क नेल्याची कबुली दिली. त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याला दम देऊन त्याच्याकडून हार्ड डिस्क ताब्यात घेतल्याची माहिती महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत देखील दिली होती.

या हार्ड डिस्क मध्ये नागरिकांकडून गोळा केलेल्या महत्त्वाच्या माहितीचा समावेश असल्याचेही सर्वसाधारण सभेत सांगण्यात आले होते. संबंधित कर्मचाऱ्याने हार्ड डिस्क गायब केल्याने शहरातील लाखो नागरिकांची महत्त्वाची माहिती इतरांच्या हातात गेल्याचे समोर आले होते. मात्र त्यानंतर महापालिका प्रशासनाने या व्यक्तीच्या विरोधात पोलिसात तक्रार केली नसल्याचेही समोर आले होते.

या सर्व प्रकाराची महापालिका आयुक्तांनी चौकशी करून त्याचा अहवाल जाहीर करावा,' अशी मागणी पतित पावन संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिनेश भिलारे यांनी केली.या बाबत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देण्यात आले. हार्ड डिस्क गायब झालेल्या घटनेची वस्तुस्थिती, त्यामध्ये असलेल्या माहितीची, सायबर सुरक्षा उपाययोजना, डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा अंतर्गत झालेली कार्यवाही, तसेच जबाबदार अधिकारी व संबंधित कंत्राटदारांवर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी भिलारे यांनी केली आहे.


महापालिकेकडे लाखो नागरिकांची मालमत्ता माहिती, जन्म-मृत्यू नोंदी, कर संबंधित माहिती आणि विविध नागरी सेवांशी संबंधित वैयक्तिक माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे ही घटना केवळ हार्ड डिस्क चोरीची नसून. नागरिकांच्या गोपनीयतेचा अधिकार, डिजिटल माहितीची सुरक्षितता आणि सार्वजनिक संस्थांवरील विश्वासाशी संबंधित आहे, असे भिलारे यांनी सांगितले. या वेळी संघटनेचे प्रांत सहसंघटक रवींद्र भांडवलकर, शहर पालक गिरीश काकडे, शहर अध्यक्ष तेजस पाबळे, मिलिंद तिकोने, यादव पुजारी, विनायक रणदिवे, योगेश वाडेकर उपस्थित होते.

# केतन हत्येचं रहस्य उलगडलं; सियाची पोलिसांसमोर कबुली

**महाईन्यूज । पुणे**

**केतन अग्रवाल हत्याकांड प्रकरणाच्या तपासात नवी माहिती समोर आली आहे. केतनला संपवण्यापेक्षा सियानं स्वत:च्या कुटुंबियांशी बोलून लग्न का मोडलं नाही, असा प्रश्न पोलिसांना पडला आहे. त्यासंदर्भात आरोपी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांची चौकशी सुरू आहे. कुटुंबियांना सांगण्यापेक्षा, त्यांना लग्न मोडण्याचा मुद्दा पटवून देण्यापेक्षा केतनला संपवणं सोपं वाटलं, अशी धक्कादायक कबुली सियानं पोलीस चौकशीत दिली आहे.**





केतनच्या हत्येमागे सियाचा नेमका काय विचार होता, याची माहिती तिच्या चौकशीतून समोर आली आहे. केतनच्या मृत्यूनंतर कुटुंबिय लग्नाचा विचार करण्यासाठी आपल्याला किमान ३ वर्षे तरी देतील, असं सियाला वाटत होतं. तिच्या चौकशीतून तशी माहिती पुढे आली आहे. चेतननं सियाशी लग्न करण्यासाठी दोन-तीन वर्षांचा वेळ मागितला होता, असा संशय पोलिसांना आहे. यासाठी चेतनचीही चौकशी केली जाणार आहे.

अरेंज मॅरेज मोडल्यावर समाजात बदनामी होईल अशी भीती सियाला होती. त्यामुळे तिनं चेतनच्या साथीनं केतनचा काटा काढण्याचा कट रचला. या संदर्भात आणखी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. फेब्रुवारीत सिया आणि केतनचा साखरपुडा झाला. त्याआधी सिया गोयल आणि चेतन चौधरी त्यांच्या मित्रांसोबत उदयपूरला फिरायला गेले होते. जानेवारीत दोघे राजस्थानला गेले. तिथे पाच दिवस थांबले. चेतन मूळचा राजस्थानचा आहे.

सिया आणि चेतन यांच्यात राजस्थान सहलीदरम्यान नेमका काय संवाद झाला, त्याचवेळी त्यांनी केतनला संपवण्याचा कट रचला होता का, याचा शोध पोलीस घेत आहेत. या सहलीशी संबंधित डिजिटल पुरावे, मोबाईल लोकेशन मिळवण्याचे प्रयत्न पोलिसांकडून सुरू आहेत. पोलिसांचे दावे खरे असल्यास केतनच्या हत्येचा हेतू केवळ लग्न टाळणं होता की यामागे अन्य कोणतं कारण होतं, हा प्रश्न कायम आहे. मोबाईल फोन, चॅट, कॉल डिटेल रेकॉर्ड, ट्रॅव्हल हिस्ट्री आणि अन्य इलेक्ट्रॉनिक पुरावे एकत्र करुन या प्रकरणाची टाईमलाईन तयार करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून सुरू आहे.

# नाशिक फाटा-खेड महामार्ग भूसंपादनासाठी निधी द्या!

## मुख्यमंत्र्यांना मागणीचे निवेदन; महापालिका, प्राधिकरण प्रशासनाला केली सूचना

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड-राजगुरूनगर मार्गाच्या भूसंपादनासाठी राज्य सरकारकडून निधी उपलब्ध होईपर्यंत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) यांच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली असून, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांना सूचना केली आहे.**



पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग हा पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण आणि खेड-राजगुरूनगरसह औद्योगिक क्षेत्रांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या मार्गाचे एलिव्हेटेड कॉरिडॉरमध्ये रूपांतर करण्याची घोषणा केली असून, त्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे. मात्र, भूसंपादनासाठी राज्य सरकारचा निधी अद्याप उपलब्ध न झाल्याने प्रकल्पाची अंमलबजावणी रखडल्याचे लांडगे यांनी नमूद केले आहे.

नाशिक फाटा ते चाकण आणि खेडदरम्यान वाढत्या नागरीकरणामुळे दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. अवघ्या ३० किलोमीटरच्या प्रवासासाठी दोन ते तीन तासांचा कालावधी लागत असून, नागरिकांचा वेळ आणि इंधन मोठ्या प्रमाणात वाया जात असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारचा निधी मिळेपर्यंत PCMC आणि PMRDA यांनी त्यांच्या अर्थसंकल्पातून तात्पुरता निधी उपलब्ध करून द्यावा. राज्य सरकारचा निधी प्राप्त झाल्यानंतर तो संबंधित संस्थांना परत करता येईल, असा पर्यायही त्यांनी सुचविला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील नाशिक फाटा ते खेड मार्गासाठी १ लाख २३ हजार ८४३ चौरस मीटर भूसंपादनाकरिता सुमारे २६२.७९ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. तर PMRDA हद्दीतील १०.५०१३ हेक्टर क्षेत्राच्या भूसंपादनासाठी सुमारे २८८ कोटी रुपयांचा निधी लागणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित विभागांना तातडीच्या सूचना देऊन PCMC आणि PMRDA यांच्या माध्यमातून भूसंपादनासाठी आवश्यक निधी उभारण्याबाबत कार्यवाही करावी, अशी विनंती आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. या निर्णयामुळे भूसंपादन प्रक्रियेला गती मिळून पुणे-नाशिक महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम वेळेत पूर्ण होईल तसेच नागरिक, उद्योजक आणि औद्योगिक क्षेत्राला वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.



> पुणे-नाशिक महामार्ग हा राज्यातील सर्वाधिक वर्दळीच्या आणि औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या मार्गांपैकी एक आहे. भूसंपादनासाठी निधीअभावी प्रकल्प रखडणे परवडणारे नाही. त्यामुळे राज्य सरकारचा निधी उपलब्ध होईपर्यंत PCMC आणि PMRDA यांनी तात्पुरता निधी उपलब्ध करून भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. या निर्णयामुळे प्रकल्पाला गती मिळेल, वाहतूक कोंडी कमी होईल आणि लाखो नागरिक, उद्योजक व औद्योगिक क्षेत्राला मोठा दिलासा मिळेल.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# पालखी मार्ग अनधिकृत होर्डिंग्जमुक्त; ७० अनधिकृत होर्डिंग्जवर हातोडा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या जुलै महिन्यातील आषाढी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) मोठी धडक कारवाई केली आहे. 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील पालखी मार्ग आता अनधिकृत होर्डिंग्जपासून पूर्णपणे मुक्त करण्यात येत असून, आतापर्यंत ७० अनधिकृत होर्डिंग्जवर अनधिकृत बांधकाम विभागाने हातोडा चालवून ती भुईसपाट केली आहेत.**







पालखी सोहळा निर्विघ्न पार पडावा, आणि वारकऱ्यांचा प्रवास सुरक्षित व्हावा, या उद्देशाने 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त के. मंजूलक्ष्मी यांनी मे महिन्यातच या मार्गांवरील होर्डिंग्जचे सर्वेक्षण करून अनधिकृत होर्डिंग्ज निष्कासित करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. या आदेशानुसार अनधिकृत बांधकाम विभागाने 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील हवेली, दौंड आणि पुरंदर तालुक्यांतील पालखी मार्गांवरील सुमारे १२३ होर्डिंग्जचे सविस्तर सर्वेक्षण केले.

या सर्वेक्षणानंतर कायदेशीर बाबींची पूर्तता न करता बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेली तब्बल ७० अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्यात आल्याची माहिती अनधिकृत बांधकाम विभागाचे सहआयुक्त हिंमत खराडे यांनी दिली. यामध्ये हवेली-सोलापूर रस्त्यावरील ३२, दौंड तालुक्यातील १३, पुरंदर तालुक्यातील १३ आणि वडकी येथील १२ अशा एकूण ७० अनधिकृत होर्डिंग्जवर प्रशासनाने थेट हातोडा चालवून ती भुईसपाट केली आहेत. तसेच, काही अनधिकृत होर्डिंगधारकांनी आपली होर्डिंग्ज स्वतःहून काढून घेतली आहेत.

केवळ मुख्य पालखी मार्गच नव्हे, तर 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील पुणे जिल्ह्यातील इतर प्रमुख मार्गांवरील आणि मोक्याच्या ठिकाणांवरील होर्डिंग्जचेही सर्वेक्षण सध्या वेगाने सुरू आहे. या सर्वेक्षणात अनधिकृत अथवा विनापरवाना उभारलेली होर्डिंग्ज आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सहआयुक्त हिंमत खराडे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे संबंधित व्यावसायिक आणि जाहिरातदारांनी 'पीएमआरडीए'ची रीतसर परवानगी घेऊनच होर्डिंग्ज उभारावीत; अन्यथा प्रशासनाकडून थेट निष्कासनाची कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशाराही 'पीएमआरडीए' प्रशासनाने दिला आहे.

> 'पीएमआरडीए'च्या हद्दीत कुठेही होर्डिंग्ज उभारताना प्रशासनाची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. नियमबाह्य आणि विनापरवाना उभारलेल्या होर्डिंग्जवर कोणतीही गय न करता थेट निष्कासनाची कारवाई केली जाईल.
>
> **- डॉ. अभिजित चौधरी, महानगर आयुक्त, पीएमआरडीए.**

# सिया गोयल : लग्न संस्थेसमोर आव्हान!



## भूमिका

**लग्न संस्था ही भारतीय समाजव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ मानली जाते. परस्पर विश्वास, सन्मान आणि जबाबदारी या मूल्यांवर तिची उभारणी झाली आहे. मात्र पुणे जिल्ह्यातील लोहगड परिसरात घडलेल्या केतन अग्रवाल हत्येच्या प्रकरणाने समाजमन अस्वस्थ केले आहे.**



तपास यंत्रणांच्या प्राथमिक माहितीनुसार, विवाह ठरलेल्या तरुणीने आणि तिच्या कथित प्रियकराने कट रचून हा गुन्हा केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाचा तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया अद्याप सुरू असल्याने अंतिम निष्कर्ष न्यायालयच देईल. मात्र या घटनेने विश्वास, नातेसंबंध आणि विवाहसंस्थेबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

प्रेमसंबंध असणे हा गुन्हा नाही आणि विवाहाबाबत स्वतःचा निर्णय घेण्याचा अधिकार प्रत्येक प्रौढ व्यक्तीला आहे. परंतु एखादे नाते नको असेल, तर ते स्पष्टपणे नाकारण्याचा मार्ग नेहमीच उपलब्ध असतो. संवाद, समजूतदारपणा आणि कायदेशीर पर्याय असताना हिंसा किंवा गुन्ह्याचा मार्ग स्वीकारणे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय ठरू शकत नाही. एका चुकीच्या निर्णयामुळे अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त होते, हे या प्रकरणातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

आजच्या काळात विवाह केवळ दोन व्यक्तींचा नाही, तर दोन कुटुंबांचा सामाजिक आणि भावनिक संबंध असतो. त्यामुळे विवाहापूर्वी दोन्ही बाजूंची स्पष्ट संमती, एकमेकांविषयीची प्रामाणिक भूमिका आणि मुक्त संवाद अत्यंत आवश्यक आहे. कुटुंबीयांच्या दबावाखाली किंवा सामाजिक प्रतिष्ठेपोटी घेतलेले निर्णय अनेकदा भविष्यात गंभीर परिणाम घडवू शकतात. त्यामुळे पालकांनीही मुलांच्या मताचा आदर करणे आणि विवाहासारख्या महत्त्वाच्या निर्णयात त्यांना स्वातंत्र्य देणे गरजेचे आहे.

या घटनेतून आणखी एक महत्त्वाचा धडा मिळतो तो म्हणजे नातेसंबंधांमध्ये प्रामाणिकपणा आणि मानसिक परिपक्वतेचे महत्त्व. फसवणूक, दुटप्पी वर्तन किंवा सूडबुद्धी यामुळे केवळ एका व्यक्तीचे नुकसान होत नाही, तर समाजातील विश्वासालाही तडा जातो. अशा घटनांमुळे विवाहसंस्थेविषयी संशयाचे वातावरण निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे. मात्र एखाद्या गुन्ह्याच्या आधारे संपूर्ण स्त्री-पुरुष समाज किंवा विवाहसंस्था यांच्याविषयी सर्वसाधारण निष्कर्ष काढणेही योग्य ठरणार नाही.

समाजात वाढत्या गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर युवक-युवतींना भावनिक समुपदेशन, नातेसंबंधांतील जबाबदारी आणि कायदेशीर परिणाम याविषयी मार्गदर्शनाची गरज आहे. शैक्षणिक संस्था, कुटुंब आणि समाज यांनी संवादाचे वातावरण निर्माण केले, तर अनेक टोकाचे निर्णय टाळता येऊ शकतात.

केतन अग्रवाल हत्येप्रकरणाचा सत्य न्यायालयीन प्रक्रियेतून समोर येईल. दोषींना कायद्यानुसार शिक्षा होणे आवश्यकच आहे. त्याचबरोबर या घटनेकडे केवळ सनसनाटी गुन्हा म्हणून न पाहता, संवादाचा अभाव, चुकीचे निर्णय आणि नैतिक मूल्यांतील घसरण यांचा इशारा म्हणून पाहणे अधिक आवश्यक आहे. विश्वास, पारदर्शकता आणि परस्पर सन्मान हीच कोणत्याही नात्याची खरी पायाभरणी आहे; ती जपली गेली तरच विवाहसंस्थेवरील समाजाचा विश्वास अधिक दृढ राहील.

## प्रासंगिक »

### विद्येची किंमत

**एकदा रामकृष्ण परमहंस गंगास्नानासाठी शिष्यासह गंगेवर गेले. त्यावेळी एक सिद्ध पुरुषही तिथे होते. त्यांनी एक चादर पाण्यावर पसरली व त्यावर उभे राहून नदी पार केली, तसेच परत आले व रामकृष्णांच्या एका शिष्याला म्हणाले तुमचे गुरु असा चमत्कार करू शकतील का? बारा वर्षे तप करून मी ही सिद्धी मिळवली आहे.**

शिष्याने रामकृष्णांना हे सांगितले ते म्हणाले," त्यांना सांग तुझा हा चमत्कार दोन आणे किमतीचा आहे." शिष्याने हा निरोप सिद्ध पुरुषाला सांगितला. तो भलताच भडकला मनाला," पुन्हा असे म्हणाला तर तुमचे भस्म करून टाकेन." 'रामकृष्णाने पुन्हा तसेच म्हटलं तेव्हा प्रत्यक्ष त्यांनाच सिद्ध पुरुषांनी त्याचा अर्थ विचारला रामकृष्ण म्हणाले, 'नावाडी सुद्धा दोन आण्यात पैलतिराला नेतो. त्याचा इतरांना उपयोग होतो पण तुमची विद्या फक्त तुमच्या पुरतीच आहे. त्या विद्येचा लोकांना उपयोग होत. नाही तिची किंमत शून्य आहे.

- तात्पर्य :

**माणसाने आपल्या विद्येचा कर्तृत्वाचा समाजाला उपयोग करून द्यावा.**

यंदाच्या उन्हाळ्यात देशातील अनेक भागांनी तीव्र पाणीटंचाईचा सामना केला. जूनच्या अखेरीस पावसाने काही प्रमाणात दिलासा दिला असला, तरी उशिरा झालेल्या मान्सूनने जलसंकटाची भीषणता अधोरेखित केली.

# जलनियोजनाच्या अभावामुळेच पाणीटंचाईचा कहर!

धरणांतील घटलेला जलसाठा, हजारो गावांची टँकरवरील वाढती निर्भरता आणि धरणांच्या परिसरातील नागरिकांनाही पिण्याच्या पाण्यासाठी मैलोनमैल भटकावे लागणे, ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून अपुऱ्या जलनियोजनाची गंभीर परिणती आहे.

पाणीटंचाईचे खापर केवळ कमी पावसावर फोडून चालणार नाही. वाढती लोकसंख्या, अनियंत्रित शहरीकरण, भूजलाचा बेसुमार उपसा, पाण्याची गळती, अकार्यक्षम वितरण व्यवस्था आणि जलस्रोतांचे दुर्लक्षित संवर्धन यामुळे संकट अधिक गडद झाले आहे. हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूपही अनिश्चित बनत असून, कमी दिवसांत अतिवृष्टी आणि उर्वरित काळात दीर्घ कोरडेपणा अशी स्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे उपलब्ध पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजनबद्ध संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.



देशातील दरडोई पाण्याची उपलब्धता सातत्याने घटत आहे. २०२१ मध्ये ती सुमारे १,४८६ घनमीटर होती, तर २०३१ पर्यंत ती १,३६७ घनमीटरपर्यंत घसरण्याचा अंदाज आहे. जागतिक सरासरीच्या तुलनेत हा आकडा अत्यंत कमी आहे. जगातील १८ टक्के लोकसंख्या भारतात राहते, मात्र गोड्या पाण्याचा वाटा केवळ ४ टक्के आहे. त्यामुळे पाण्याचा कार्यक्षम वापर आणि दीर्घकालीन जलव्यवस्थापन हा पर्याय नसून अपरिहार्यता आहे.

भारतीय शेती सर्वाधिक पाण्याचा वापर करणारे क्षेत्र आहे. सिंचनासाठी अजूनही मोठ्या प्रमाणावर मान्सूनवर अवलंबून राहावे लागते. पारंपरिक सिंचन पद्धतींमुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होतो. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन तंत्रांचा व्यापक प्रसार, कमी पाणी लागणाऱ्या पिकांना प्रोत्साहन आणि भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजनांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रत्येक शहर आणि गावात पावसाचे पाणी साठवणे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, नदी-नाल्यांची स्वच्छता आणि जलसंधारणाची कामे सातत्याने राबवली पाहिजेत.

पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून सामाजिक आणि आर्थिक विकासाचा पाया आहे. त्यामुळे जलनियोजन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आज योग्य नियोजन केले, तर उद्याची पिढी पाण्याच्या भीषण संकटापासून वाचू शकते. अन्यथा, भविष्यातील संघर्ष केवळ पाण्यासाठीच होण्याची भीती नाकारता येणार नाही.

## ।। अभंगवाणी ।।



तान्हेल्याची धणी ।
फिटे गंगा नव्हे उणी ॥१॥

माझे मनोरथ सिद्धी ।
पाववावे कृपानिधी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नमकहराम गेलेत, कट्टर शिवसैनिक नाही

## वाशिम दौऱ्यात उद्धव ठाकरेंचा बंडखोरांवर घणाघात; सभेत जोरदार भाषण

**महाईन्यूज । मुंबई**

**वाशिम-यवतमाळ जिल्ह्याचे विद्यमान खासदार संजय जाधव यांनी ठाकरेंच्या शिवसेनेतून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्याबरोबर ठाकरेंचे पाच खासदारही शिंदेंच्या शिवसेनेत गेले. यामुळे उद्धव ठाकरे यांनी आता महाराष्ट्रभर दौरे करायला सुरुवात केली आहे. आज जे वाशिम यवतमाळ जिल्ह्यात होते. यावेळी त्यांनी बंडखोर खासदारांचा उल्लेख नमकहराम असा केला.**



उद्धव ठाकरे म्हणाले, "काही जणांनी कोल्हेकुई सुरू केली आहे की शिवसेना संपली. उद्धव ठाकरे फिरत नाहीत. मग म्हटलं मी आता फिरतोच. राहिलेली शिवसेना दाखवतो आणि त्याची ताकदही दाखवतो. हरामखोर गेलेत, नमकहराम गेलेत, पण कट्टर शिवसैनिक एकही जागचा हललेला नाहीय."

"काही वेळेला काय होतं की चांगल्या गोष्टीला नजर लागते. वाशिम यवतमाळ मतदारसंघ आहे, हा भगव्याचा बालेकिल्ला आहे. या वाशिमच्या जिल्ह्याची निर्मितीच बाळासाहेब ठाकरेंनी केली. ज्याच्या हातात भगवा आहे, तो आपला असं समजून येथील लोकांनी मतदान केलं. पण गेल्या २-४ वर्षांपासून गद्दारीची किड लागली. आधीची गद्दारी गाडून टाकायची म्हणून नवं बुजगावणं उभं केलं. तर त्यानेही गद्दारी केली. पण गद्दारीला आणि नमकहरामीला थारा द्यायचा नाही", असं उद्धव ठाकरे म्हणाले.

"कोणी शाखेत काम घेऊन आला तर आम्ही त्याला त्याचा पक्ष विचारत नाही. रक्ताची गरज असेल तर आम्ही त्याला त्याचा पक्ष विचारत नाही. कोणत्याही पक्षाचा असो, अगदी भाजपाचा असला तरीही शिवसैनिक रक्तदान करतो. निष्ठेचे दोन थेंब रक्त या गद्दारांना दिलं पाहिजे", असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

ते पुढे म्हणाले, "दुर्दैवाने नमकहराम हलला असला तरीही मी हललेलो नाही. मी वचनबद्ध आणि कटीबद्ध आहे. मी हलणार नाही. मी थकणार नाही, खचणार नाही. तुमच्यासारखे मर्द शिवसैनिक तुमच्याबरोबर आहेत. संकटाच्या छाताडावर चालून जाणारे शिवसैनिक जे बाळासाहेबांनी मला दिले आहेत, ते जोपर्यंत माझ्यासोबत आहेत तोपर्यंत कितीही संकट येऊ दे त्यांना पायदळी तुडवून त्यांच्या उरावर भगवा रोवून मी पुढे जाणार आहे."

उद्धव ठाकरे म्हणाले, "आईला काय वाटेल? आईची शपथ घेऊन हे गद्दारी करणार असतील. तर खरोखर आईला काय वाटत असेल? चूक आपल्या सगळ्यांची झाली. विशेषत: माझी झाली. याने पूर्वी एकदा आपल्याशी गद्दीरी केली होती. तरी परत आले. एवढे शिवसैनिक असताना शिवसेनेवर संकट येऊच शकत नाहीत. तू स्वत:ची काळजी कर माझी करु नकोस.", अशा शब्दात ठाकरेंनी संजय देशमुखांवर प्रहार केला.

### भाजपाचं हिंदुत्त्व भोंदूत्व

ते पुढे म्हणाले, "नमकहरामी शिवी नाहीय. कारण उपकारकर्त्याचे उपकार विसरून त्याच्याशीच दगाबाजी करणारा हरामखोर असतो. मिंध्यांपासून सगळे हरामखोर आहेत." ते पुढे म्हणाले, "गद्दारी शिवसेनेशी झालेली नाही, तर गद्दारी हिंदुत्त्वाशी झालेली आहे. एकात तरी लोकसभेत उठून प्रश्न विचारण्याची हिंमत आहे का. राम मंदिराचा मुद्दा, आपल्याशी गद्दारी केलेला मुद्दा सोडता येणार नाही. आम्ही अस्सल कडवट हिंदू आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवा आमच्या हातात आहे. पण भाजपाचं हिंदुत्त्व हे भोंदूत्व आहे", अशीही टीका त्यांनी केली.

# मोहरमच्या मिरवणुकीत 'पेन किलर' सांगून उंदीर मारण्याच्या गोळ्यांचं वाटप

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबईमधील भायखळा परिसरात शुक्रवारी रात्री एक धक्कादायक घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. मोहरमच्या मिरवणुकीत एका व्यक्तीने पेन किलरच्या गोळ्या सांगून उंदीर मारण्याच्या गोळ्यांचं वाटप केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मात्र, ही घटना मुंबई पोलिसांच्या सतर्कतेमुळे वेळीच लक्षात आली आणि पोलिसांनी हा घातपाताचा कट उधळून लावला आहे.**



### आरोपीचं पुणे कनेक्शन?

"या घटनेतील आरोपी हा पुण्यातील विमाननगर परिसरातील आहे. तो आरोपी २०२५ मध्ये इराण आणि इराकला जाऊन आलेला आहे, अशी माहिती आतापर्यंत तपासात समोर आलेली आहे. आता त्या आरोपीची पुढील चौकशी सुरू आहे", अशी माहिती देखील पोलीस उपायुक्त जयंत मीना यांनी पत्रकार परिषदेत सांगितली आहे.

या प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून पुढील चौकशी सुरू आहे. या आरोपीकडून तब्बल १४ हजार गोळ्यांचा साठा जप्त करण्यात आला आहे. या संपूर्ण घटनेची माहिती पोलीस उपायुक्त जयंत मीना यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

"भायखळा पोलिसांच्या हद्दीत शुक्रवारी रात्री मोहरमची मिरवणूक सुरू होती. त्या दरम्यान एक संशयित व्यक्ती मुंबई पोलिसांना दिसून आला. तो व्यक्ती त्या मिरवणुकीत काही गोळ्यांचं वाटत करत होता. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावला. त्यामुळे पोलिसांनी त्याची विचारपूस केली असता त्याने सांगितलं की तो पेन किलरच्या गोळ्या वाटत आहे. मात्र, कोणतीही परवानगी न घेता तो अशा प्रकारच्या गोळ्या वाटत असल्याने मुंबई पोलिसांनी त्या व्यक्तीकडून सर्व साठा जप्त केला", अशी माहिती पोलीस उपायुक्त जयंत मीना यांनी पत्रकार परिषदेत सांगितली.

"त्यानंतर त्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती जसं की, आधार कार्ड, मोबाईल आणि पासपोर्ट सर्व जप्त केलं. त्यानंतर पहाटे ४ च्या दरम्यान पोलीस ठाण्यात एक तक्रार आली की एका व्यक्तीला पोटदुखी आणि उलट्याचा त्रास होत होता. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावला आणि लगेच पोलिसांचं एक पथक रवाना झालं आणि मिरवणुकीत गोळ्यांचं वाटप करणाऱ्या व्यक्तीला ताब्यात घेतलं", अशी माहिती पोलीस उपायुक्त जयंत मीना यांनी दिली.

"त्यानंतर आरोपीची चौकशी केली असता त्या व्यक्तीने कबुली दिली की, काही ठराविक लोकांना टार्गेट करून लोकांना हानी पोहोचवण्याचा त्याचा उद्देश होता. आरोपीचं नाव फय्याज प्रेमजी असं असून आरोपीने तब्बल ३० हजार कॅप्सूल ऑनलाईन ऑर्डर केल्या होत्या. त्याचबरोबर ५० किलो झिंक फॉस्फाईड ऑर्डर केलं होतं. तसेच प्रत्येक कॅप्सूलमध्ये एक-एक ग्रॅम झिंक फॉस्फाईड टाकून गोळ्या तयार केल्या होत्या आणि काही ठराविक लोकांना टार्गेट करण्याचा त्याचा कट होता", अशी माहिती पोलीस उपायुक्त जयंत मीना यांनी सांगितली.

"आरोपीने मिरवणुकीतील लोकांना सांगितलं होतं की ही कॅप्सूल पेन किलर म्हणून काम करती आणि तो मिरवणुकीतील लोकांना गोळ्यांचं वाटप करत होता. मात्र, मुंबई पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा घातपाताचा कट उधळून लावण्यात आला आहे", अशी माहिती पोलीस उपायुक्त जयंत मीना यांनी दिली आहे.

# होर्मुझच्या सामुद्रधुनीत पुन्हा युद्ध पेटले

## इराणचा मालवाहू जहाजावर ड्रोन हल्ला, अमेरिकेचे प्रत्युत्तर

महाईन्यूज । अमेरिका

**इराण आणि अमेरिका यांच्यात झालेला युद्धबंदीचा करार अवघ्या नऊ दिवसांतच मोडीत निघण्याची चिन्हे आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या एका व्यापारी जहाजावर इराणने ड्रोन हल्ला केल्यानंतर, अमेरिकेने शुक्रवारी इराणच्या लष्करी तळांवर आणि रडार केंद्रांवर जोरदार हवाई हल्ले केले. या कारवाईमुळे पर्शियन आखातातील तणाव पुन्हा एकदा टोकाला पोहोचला आहे.**



२५ जून रोजी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून ओमानच्या किनारपट्टीवरून प्रवास करणाऱ्या 'एम/व्ही एव्हर लव्हली' या सिंगापूरचे ध्वज असलेल्या व्यापारी जहाजावर इराणने आत्मघातकी ड्रोनद्वारे हल्ला केला. इराणने एकूण चार ड्रोन डागले होते, त्यापैकी तीन ड्रोन अमेरिकेने हवेतच पाडले, तर एका ड्रोनचा फटका जहाजाच्या वरच्या भागाला बसला. सुदैवाने, या हल्ल्यात जहाजावरील कोणत्याही कर्मचाऱ्याला दुखापत झाली नाही आणि जहाजाचे इंजिन व नौकानयन यंत्रणा सुरक्षित राहिली.

या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकन सेंट्रल कमांडने २६ जून रोजी इराणवर ९० मिनिटे मोठी लष्करी कारवाई केली. अमेरिकेच्या एफ-३५ आणि एफ-१६ लढाऊ विमानांनी इराणच्या किनारपट्टीवरील तीन आणि 'केशम' बेटावरील एका ठिकाणासह एकूण चार लष्करी तळांना लक्ष्य केले. यामध्ये इराणचे क्षेपणास्त्र साठे, ड्रोन केंद्रे आणि किनारपट्टीवरील रडार यंत्रणा उद्ध्वस्त करण्यात आल्या.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर लिहिले की, "इराणने केलेला हा हल्ला युद्धबंदी कराराचे स्पष्ट उल्लंघन आहे. त्यांना याचे परिणाम भोगावे लागतील." तर उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हॅन्स यांनी कडक शब्दांत सुनावले की, "काही मतभेद असतील तर फोनवर चर्चा करा, हिंसेला हिंसेनेच उत्तर दिले जाईल."

अमेरिका आणि इराण यांच्यात १७ जून रोजी एक १४ कलमी युद्धबंदी करार झाला होता. या करारानुसार ६० दिवसांसाठी हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या व्यापारी जहाजांकडून कोणताही कर न घेण्याचे इराणने मान्य केले होते. हा जलमार्ग जागतिक तेल आणि वायू वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. परंतु, इराणच्या अधिकाऱ्यांनी ६० दिवसांनंतर पुन्हा कर वसूल करण्याची भाषा सुरू केली. तर ट्रम्प यांच्या मते इराणने कोणताही कर न लावण्याचे आश्वासन दिले होते. याच वादातून दोन्ही देशांमधील संबंध पुन्हा बिघडले.

### इराणची प्रतिक्रिया

अमेरिकेच्या या हल्ल्यानंतर इराणच्या संसदेने तीव्र संताप व्यक्त केला आहे. "अमेरिकेने पुन्हा एकदा वाटाघाटी सुरू असतानाच इराणवर हल्ला केला आहे. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष हे युद्धबंदीच्या तत्त्वांचे पालन करत नाहीत," अशी टीका इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा आयोगाने केली आहे.

या वाढत्या तणावामुळे आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेने या भागात अडकलेल्या ११,००० हून अधिक खलाशांना बाहेर काढण्याची मोहीम तात्पुरती स्थगित केली आहे. सध्या अमेरिकन लष्कराने व्यापारी जहाजांच्या सुरक्षेसाठी या भागात कडक पहारा ठेवला आहे.

# डोनाल्ड ट्रम्प भारत दौऱ्यावर येणार; ऐतिहासिक व्यापारी करार अंतिम टप्प्यात

महाईन्यूज । नवी दिल्ली

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प २०२७ च्या सुरुवातीला भारताचा दौरा करणार आहेत, अशी माहिती भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी आयएएनएस (IANS) या वृत्तसंस्थेला दिलेल्या विशेष मुलाखतीत दिली आहे. दोन्ही देश दीर्घकाळापासून प्रलंबित असलेला व्यापारी करार अंतिम करण्यासाठी आणि ऊर्जा, संरक्षण तसेच तंत्रज्ञान क्षेत्रातील संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्नशील असतानाच या दौऱ्याचं नियोजन समोर आलं आहे.**



भारताकडून होणाऱ्या आयातीवर अमेरिकेने ५० टक्क्यांहून अधिक शुल्क लादल्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले होते. त्यानंतर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा हा पहिलाच भारत दौरा असेल. सर्जिओ गोर हे भारतात गेल्या सहा महिन्यांपासून दौऱ्यावर होते. ते नुकतेच मायदेशी परतले. त्यावेळी ते म्हणाले की, राष्ट्राध्यक्षांच्या या दौऱ्याची तयारी आधीच सुरू झाली आहे. ट्रम्प आणि मोदी यांचे संबंध हे दोन्ही देश एकत्र मिळून जे काही उभारत आहेत त्याचा मुख्य पाया आहे, असेही ते म्हणाले. वॉशिंग्टन आपल्या सर्वात महत्त्वपूर्ण भागीदारींपैकी एक असलेल्या या संबंधांना अधिक मजबूत करण्यासाठी पावले उचलत असताना, परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ देखील या द्विपक्षीय अजेंड्याला पुढे नेण्यात गुंतलेले आहेत, असं गोर यांनी सूचित केलं.

"मी राष्ट्राध्यक्षांच्या दौऱ्याला अंतिम रूप देण्यासाठी भारतात जाणार आहे", असं गोर यांनी आयएएनएसला सांगत ट्रम्प यांच्या भारत दौऱ्याचे राजनैतिक पातळीवर सक्रियपणे नियोजन सुरू असल्याचं स्पष्ट केलं. फ्रान्समधील जी-७ (G7) शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात झालेल्या सौहार्दपूर्ण आणि व्यापक बैठकीच्या काही आठवड्यांनंतर ही घोषणा झाली आहे. ही चर्चा तासभरापेक्षा जास्त वेळ चालली आणि यामध्ये व्यापार, संरक्षण आणि इतर द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा झाली. "ती एक विलक्षण आणि अत्यंत सौहार्दपूर्ण बैठक होती, ज्यामध्ये त्यांनी तासभर एकत्र वेळ घालवला. त्यांनी अनेक पैलूंवर चर्चा केली. ही बैठक खूप फलदायी ठरली. आशा आहे की पुढील काही आठवड्यांत यातील काही गोष्टींची घोषणा केली जाईल", असं गोर म्हणाले.

# 14 वर्षांनंतरही डायना पेंटीची जादू कायम



कॉकटेल 2 सध्या चित्रपटगृहांमध्ये चांगली कमाई करत असून या चित्रपटामुळे 2012 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'कॉकटेल'चीही पुन्हा एकदा चर्चा रंगली आहे. या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणारी अभिनेत्री डायना पेंटी आजही प्रेक्षकांच्या मनात 'मीरा' या भूमिकेमुळे कायम आहे. 'कॉकटेल'ला तब्बल 14 वर्षे पूर्ण झाली असली तरी डायनाची लोकप्रियता अजूनही कायम आहे. कॉकटेल'मध्ये डायना पेंटीने सैफ अली खान आणि दीपिका पदुकोण यांच्यासोबत मुख्य भूमिका साकारली होती. चित्रपटातील तिची साधी, निरागस आणि भावनिक 'मीरा' ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली होती. या भूमिकेमुळे तिला बॉलिवूडमध्ये वेगळी ओळख मिळाली. या चित्रपटानंतर डायना 'हॅपी भाग जाएगी', 'हॅपी फिर भाग जाएगी', 'परमाणू : द स्टोरी ऑफ पोखरण', 'शिद्दत' आणि 'ब्लडी डॅडी' यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये झळकली. विविध प्रकारच्या भूमिका साकारत तिने अभिनयातील आपली क्षमता सिद्ध केली. चित्रपटांबरोबरच डायनाने ओटीटी विश्वातही पदार्पण केले. 2025 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'डू यू वाना पार्टनर' या कॉमेडी-ड्रामा वेब सीरिजमधून तिने डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रवेश केला. याशिवाय 2025 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'छावा' या गाजलेल्या चित्रपटातही ती महत्त्वाच्या भूमिकेत दिसली होती. डायना पेंटीने बॉलिवूडनंतर दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतही आपले नशीब आजमावले. 2022 मध्ये प्रदर्शित झालेल्या मल्याळम क्राइम-थ्रिलर 'सॅल्युट'मधून तिने साऊथ इंडस्ट्रीत पदार्पण केले. या चित्रपटातील तिच्या अभिनयालाही चांगली दाद मिळाली. सध्या डायना कोणत्याही नवीन चित्रपट किंवा वेब सीरिजमध्ये दिसलेली नसली, तरी ती विविध फॅशन इव्हेंट्स आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमुळे चर्चेत असते. नुकत्याच झालेल्या 79 व्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये ती तिसऱ्यांदा सहभागी झाली होती. रेड कार्पेटवरील तिच्या आकर्षक लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कान्समध्ये डायनाने नेसलेली सोनेरी रंगाची साडी विशेष चर्चेचा विषय ठरली. पारंपरिक साडीला आधुनिक जॅकेट आणि स्टायलिश बेल्टची जोड देत तिने भारतीय आणि पाश्चात्य फॅशनचा सुंदर मिलाफ सादर केला. तिच्या या लूकचे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात कौतुक झाले.




# स्नेहल तरडेंचे वटपौर्णिमानिमित्त महिलांना खास आवाहन

अभिनेत्री स्नेहल तरडे यांनी 'देऊळ बंद 2' चित्रपटात मुख्यभूमिका साकारली. या चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. यानंतर आता स्नेहल तरडेने वटपौर्णिमानिमित्त महिलांना खास आवाहन केले आहे. स्नेहल तरडेंनी रील शेअर करत एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. स्नेहल तरडेंनी कॅप्शनमध्ये महिलांना झाडे लावून वटपौर्णिमा साजरी करण्याचे आवाहन केले आहे. स्नेहल तरडे यांनी पोस्टमध्ये लिहिलं, "माझ्या सर्व प्रिय मैत्रिणींनो, तुम्हाला एक प्रेमळ आवाहन करू का? वटपौर्णिमा जवळ आली आहे. या वटपौर्णिमेला तुम्ही तुमच्या पतीच्या नावाने एक वडाचं रोपटं तुमच्या घराजवळच्या मोकळ्या जागेत, एखाद्या टेकडीवर, रस्त्याच्या कडेला असलेल्या मोकळ्या जागेत जिथे तुम्हाला अधून मधून जाणं शक्य असेल अशा कोणत्याही ठिकाणी लावा आणि ते वाढवा." पुढे त्यांनी लिहिलं, "दरवर्षी तुम्ही स्वतः लावलेल्या त्या वडाची पूजा करा. तुम्ही वाढवलेला तो एक वड अनेक पक्ष्यांना निवारा देईल, वाटसरूंना सावली देईल, परिसर हिरवा आणि थंड राखण्यासाठी मदत करेल आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तुम्ही नसताना देखील पुढची शेकडो वर्षे तुमच्या आणि तुमच्या पतीच्या प्रेमाची साक्ष देत दिमाखात उभा राहील. तुम्हा सर्वांना वटपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!" या व्हिडिओमध्ये स्नेहल तरडे यांनी वडाच्या झाडाला उद्देशून त्या म्हणाल्या, "चांगल्या जागेमध्ये लावलं आहे तुला...त्यामुळे चांगला मोठा हो. आता छोट्या जागेमध्ये नाही तू, आता तुला मोठी जमीन आहे; त्यामुळे छान मोठा हो..." शेवटी त्यांनी वटवृक्षाला नमस्कार केला आणि श्री स्वामी समर्थ म्हणून आशीर्वाद घेतले.

# 18 वर्षांनंतर सुपरहिट जोडी पुन्हा एकत्र!






अक्षय कुमार ( Akshay Kumar ) आणि सैफ अली खान (Saif Ali Khan) यांची लोकप्रिय जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. 'भूत बंगला' या चित्रपटाच्या यशानंतर दिग्दर्शक प्रियदर्शन आणखी एक चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. त्यांच्या आगामी सस्पेन्स-क्राइम थ्रिलर चित्रपटाबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. या चित्रपटाचे नाव हैवान ( Haiwaan) असून गेल्या अनेक दिवसांपासून चित्रपटाविषयी अपडेट समोर येत आहेत. आता या चित्रपटाची रिलीज डेट समोर आली आहे. त्यामुळे चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. खिलाडी आणि अनाडी अर्थात अक्षय कुमार आणि सैफ अली खान या चित्रपटात एकत्र स्क्रिन शेअर करताना दिसणार आहेत.

# फुटबॉल आमच्या चारित्र्याची परीक्षा

## इजिप्तविरुद्धचा सामना बरोबरीत सुटल्याने व्यक्त केल्या भावना; 'फेअर प्ले' मेसेज

**महाईन्यूज ।**
इराण

**फिफा विश्वचषक २०२६ मधील Group Gच्या इजिप्तविरुद्धच्या सामन्यात झालेल्या वादानंतर, इराणच्या राष्ट्रीय फुटबॉल संघाने सिएटलमधील (Seattle) आपल्या ड्रेसिंग रूममध्ये 'फेअर प्ले' (Fair Play - प्रामाणिक खेळ) आणि खिलाडूवृत्तीचा संदेश देणारी एक चिठ्ठी सोडली आहे.**



इराण आणि इजिप्त यांच्यातील हा सामना १-१ असा बरोबरीत सुटला. या बरोबरीसह इजिप्तने ऐतिहासिक कामगिरी करत बाद फेरीत धडक मारली आहे. या सामन्यानंतर, इराणच्या संघाने 'तस्नीम न्यूज एजन्सी'ने 'X' (ट्विटर) वर पोस्ट केलेल्या एका फोटोच्या माध्यमातून एक विचार करायला लावणारे पत्रक प्रसिद्ध केले. यामध्ये त्यांनी निकालापलीकडे जात सन्मान, चारित्र्य आणि आदराची भावना जपण्यावर भर दिला आहे.

"आम्ही इराणमधून आलो आहोत... अशी भूमी जिथे हजारो वर्षांपासून विजयापेक्षा सन्मानाला अधिक महत्त्व दिले गेले आहे. आमच्यासाठी फुटबॉल हा केवळ निकालासाठी खेळली जाणारी स्पर्धा नसून, तो चारित्र्याची परीक्षा आहे. कदाचित गुण अनेक मार्गांनी मिळवता येतील, पण आदर नाही. कदाचित एखादा संघ गटातून पुढे जाऊ शकेल, पण केवळ निष्पक्षता आणि सन्मानानेच इतिहासात ताठ मानेने उभे राहता येते," असे संघाने नमूद केले आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, याआधीच्या सामन्यातही इराणने रविवारी (स्थानिक वेळेनुसार) सोफी स्टेडियमच्या (SOFI STADIUM) ड्रेसिंग रूममध्ये एक संदेश सोडला होता. बेल्जियमविरुद्धचा सामना ०-० असा बरोबरीत सुटल्यानंतर त्यांनी लॉस एंजेलिसच्या आदरातिथ्याबद्दल आभार मानले होते आणि आपण सन्मानाने परतत असल्याचे म्हटले होते.

विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत आज गट 'जी'मधील इराण आणि इजिप्त आमने-सामने होते. अत्यंत चुरशीच्या सामन्यात इराणविरुद्ध १-१ अशी वजाबाकी (किंवा बरोबरी) साधत इजिप्तने पहिल्यांदाच फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत प्रवेश करून इतिहास रचला. इराणच्या रामिन रेझायान याला त्याच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी 'प्लेअर ऑफ द मॅच' म्हणून गौरविण्यात आले. सामन्याच्या सुरुवातीलाच इजिप्तने आघाडी घेतली. मोहम्मद सलाहचा डिफ्लेक्ट (DEFLECTED) झालेला शॉट इराणचा गोलरक्षक अलिरझा बेइरानवंदने रोखला, पण रिबाउंडवर महमूद साबेरने अगदी जवळून सुरेख गोल करत इजिप्तचे खाते उघडले.इराणनेही यावर झटपट प्रत्युत्तर दिले. सामन्याच्या ९ व्या मिनिटाला मोहम्मद अब्देलमोनेमने मेहदी तारेमीला पेनल्टी बॉक्समध्ये पाडल्यामुळे इराणला बरोबरी साधण्याची सुवर्णसंधी मिळाली.

### 'फेअर प्ले' फुटबॉलमधील नियमांचा आत्मा

'फेअर प्ले' हा केवळ फुटबॉलच्या नियमांमधील एक शब्द नाही, तर तो या खेळाचा आत्मा आहे. सिएटल, तुमच्या आदरातिथ्याबद्दल धन्यवाद, आणि इराणसाठी आपले हृदय, आपला आवाज आणि आपले सर्वस्व पणाला लावणाऱ्या सर्व इराणी नागरिकांचे मनापासून आभार. इराण, नेहमी ताठ मानेने उभा राहील," असे या चिठ्ठीत लिहिले होते. इजिप्तचा गोलरक्षक मोस्तफा शोबेइरने ही पेनल्टी उत्कृष्टपणे वाचवली.शोबेइरने आपला अप्रतिम फॉर्म कायम ठेवत मिलाद मोहम्मदीचा आणखी एक धोकादायक शॉट रोखला.

# अभिषेक शर्मा 'टॉप'ला! सूर्यकुमार यादवचे दोन रेकॉर्ड मोडित

**महाईन्यूज ।** नवी दिल्ली

**अभिषेक शर्माने (Abhishek Sharma) आयर्लंडविरुद्ध खेळलेल्या ४९ धावांच्या खेळीदरम्यान सूर्यकुमार यादवचे दोन मोठे विक्रम मोडीत काढले. तो आता भारताकडून टीत२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात कमी चेंडूंमध्ये १,००० धावा पूर्ण करणारा फलंदाज बनला आहे.**



आयर्लंडविरुद्धच्या सामन्यात भारताचा स्टार सलामीवीर अभिषेक शर्माने उत्कृष्ट फलंदाजी करत २० चेंडूंमध्ये २ षटकार आणि ७ चौकारांच्या मदतीने ४९ धावांची खेळी केली. अभिषेक या सामन्यात भारतासाठी सर्वोच्च धावसंख्या उभारणारा फलंदाज ठरला. त्याने खेळपट्टीवर चांगला संघर्ष केला, मात्र तो भारताला विजय मिळवून देण्यात यशस्वी ठरला नाही. या खेळीदरम्यान अभिषेकने टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपल्या १,००० धावा पूर्ण केल्या आणि सूर्यकुमार यादवला मागे टाकले.

अभिषेकने आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यात २ षटकार ठोकले. यासह तो टी२०आय मध्ये ४६ डावांनंतर (Innings) सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीत थेट 'युनिव्हर्स बॉस' ख्रिस गेलसोबत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. षटकार ठोकण्यातही अभिषेकने सूर्यकुमार यादवला मागे टाकले आहे. सूर्यकुमारने T20Iमध्ये ४६ डावांनंतर एकूण ९६ षटकार मारले होते. या यादीत इव्हिन लुईस पहिल्या क्रमांकावर असून त्याने ४६ डावांनंतर एकूण ११० षटकार ठोकले होते.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अवघ्या ४६ डावांनंतर सर्वाधिक षटकार ठोकण्याचा विक्रम इव्हिन लुईसच्या (११० षटकार) नावावर आहे. त्यानंतर अभिषेक शर्मा आणि ख्रिस गेल (प्रत्येकी ९८ षटकार) संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर, सूर्यकुमार यादव (९६ षटकार) तिसऱ्या, तर कॉलिन मुनरो (८४ षटकार) चौथ्या स्थानावर आहेत. फलंदाजांच्या आक्रमक खेळीची ही आकडेवारी त्यांच्या विस्फोटक फलंदाजीची साक्ष देते.

### अभिषेकने मोडला सूर्यकुमार यादवचा विक्रम

अभिषेक शर्माने ४९ धावांच्या या खेळीदरम्यान टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आपल्या १,००० धावांचा टप्पा पार केला. आता तो भारताकडून टी२०आय मध्ये सर्वात कमी चेंडूत १,००० धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी पोहोचला आहे. अभिषेक शर्माने टी२०आय मधील आपल्या १,००० धावा अवघ्या ५२८ चेंडूंमध्ये पूर्ण केल्या. सूर्यकुमार यादवने ही कामगिरी ५७३ चेंडूंमध्ये केली होती. . या यादीत शिवम दुबे तिसऱ्या, तर संजू सॅमसन आणि हार्दिक पंड्या संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहेत.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। रविवार ।
दि. 28 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# एमआयटीच्या चार विद्यार्थ्यांची ‘सायबर वॉरियर्स’ म्हणून निवड!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

डिजिटल सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने क्विक हील फाऊंडेशन आणि एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांची ‘सायबर वॉरियर्स’ म्हणून निवड करण्यात आली आहे.

या उपक्रमात शिवप्रसाद जाधव यांची अध्यक्ष, मानसी जाधव यांची सचिव, पूर्वजा महाजन यांची ॲक्टिव्हिटी डायरेक्टर आणि सोहेश देशमुख यांची मीडिया डायरेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हे विद्यार्थी सायबर सुरक्षेविषयी जनजागृती, प्रशिक्षण आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजात डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणार आहेत.

पुणे येथील क्विक हील फाऊंडेशनच्या कार्यालयात आयोजित विशेष प्रशिक्षण सत्रात अजय शिर्के, दिपू सिंग आणि गायत्री केसकर यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक प्रतिबंध आणि डिजिटल सुरक्षेच्या विविध पैलूंविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना, “सायबर सुरक्षेबाबत समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे,” असे सांगितले.


> “आजच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे ज्ञान ही काळाची गरज आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची ‘सायबर वॉरियर्स’ म्हणून झालेली निवड ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजात सायबर सुरक्षिततेबाबत व्यापक जनजागृती होईल आणि जबाबदार डिजिटल नागरिक घडविण्यात त्यांचे मोलाचे योगदान राहील, असा मला विश्वास आहे.”
>
> **- डॉ. बी. बी. वाफारे,**
> **प्राचार्य.**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. वाफारे, उपप्राचार्या डॉ. अक्षदा कुलकर्णी, शिक्षक समन्वयक प्रा. अमित ताले, विभागप्रमुख तसेच संगणक शास्त्र विभागातील प्राध्यापकांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये आणि समाजामध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करून सुरक्षित डिजिटल भारत घडविण्यासाठी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहणार असल्याचे महाविद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.




D Y PATIL
INTERNATIONAL
UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp




CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# ‘जस्टीस फॉर केतन अग्रवाल’

## रहिवाशांचा कँडल मार्च; केतनच्या सोसायटीतील नागरिक न्यायासाठी एकवटले

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मावळ तालुक्यातील लोहगडावर केतन अग्रवाल याला ढकलून देऊन खून केल्याच्या प्रकरणाच्या निषेधार्थ गहुंजे येथील लोढा बेलमोंडो सोसायटीमध्ये शनिवारी (दि. २७) सायंकाळी शांततेत कॅन्डल मार्च काढण्यात आला. न्याय मिळावा, या एकाच मागणीसाठी सोसायटीतील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.**

केतन अग्रवाल यांच्या मृत्यू प्रकरणामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असताना न्यायाच्या मागणीसाठी लोढा बेलमोंडो सोसायटीतील रहिवाशांनी एकत्र येत शांततापूर्ण मूक कॅन्डल मार्च काढला. सायंकाळी सातच्या सुमारास आयोजित करण्यात आलेल्या या मार्चमध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. हातात मेणबत्त्या आणि न्यायाची मागणी करणारे फलक घेऊन नागरिकांनी शांततेत आपली भूमिका मांडली.

या मूक आंदोलनात सहभागी झालेल्या नागरिकांनी ‘जस्टीस फॉर केतन अग्रवाल’, ‘अन्यायाविरोधात ठाम पाऊल’,



‘न्यायासाठी अखंड लढा’ अशा संदेशांनी सजलेले फलक हातात घेतले होते. कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा घोषणाबाजी न करता नागरिकांनी शांत, संयमी आणि शिस्तबद्ध पद्धतीने न्यायाची मागणी केली. या आंदोलनाचा उद्देश केवळ केतन अग्रवाल यांच्या मृत्यू प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, हा असल्याचे उपस्थितांनी स्पष्ट केले. रहिवाशांनी या घटनेबाबत तीव्र दुःख व्यक्त करत, सत्य समोर येणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरू राहील, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

### न्यायव्यवस्थेवर आपला विश्वास

लोढा बेलमोंडो सोसायटी परिसरातून काढण्यात आलेल्या या कॅन्डल मार्चमध्ये महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि विविध क्षेत्रातील रहिवाशांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सर्वांनी शांततेच्या मार्गाने एकजूट दाखवत न्यायव्यवस्थेवर आपला विश्वास असल्याचे अधोरेखित केले. समाजात कायद्याचे राज्य टिकून राहण्यासाठी प्रत्येक नागरिकाने अन्यायाविरोधात आवाज उठवणे आवश्यक असल्याचे मतही अनेकांनी व्यक्त केले.

## मुलीच्या उपचारासाठी कर्ज फेडण्यासाठी गुन्हेगाराचा पिस्तूल विक्रीचा धंदा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मुलीच्या उपचारासाठी झालेले मोठे कर्ज फेडण्यासाठी एका सराईत गुन्हेगाराने थेट पिस्तूल विक्रीचा व्यवसाय सुरू केला. येरवडा कारागृहात शिक्षा भोगत असताना त्याची ओळख मध्य प्रदेशातील शस्त्र पुरवठादाराशी झाली होती. त्याच संपर्कातून तीन गावठी पिस्तुले आणि सहा जिवंत काडतुसे आणून पुणे जिल्ह्यात विक्रीचा प्रयत्न करणाऱ्या या गुन्हेगाराला पहिल्याच प्रयत्नात गुंडा विरोधी पथकाने रंगेहात अटक केली.**



शब्बीर उर्फ मलीक जहाँगीर शेख (३८, रा. कर्वेनगर, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्यासह मध्य प्रदेशातील शस्त्र पुरवठादार पप्पी सिंग याच्याविरुद्ध भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी गुंडा विरोधी पथकाचे पोलीस शिपाई शुभम कदम यांनी फिर्याद दिली आहे.

सहायक पोलीस निरीक्षक हरीश माने यांनी दिलेल्या माहितीनुसार, शब्बीर हा पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर २०१२ पासून वारजे पोलीस ठाण्यात १४ आणि उत्तमनगर पोलीस ठाण्यात एक असे एकूण १५ गुन्हे दाखल आहेत. काही वर्षांपूर्वी त्याच्या मुलीच्या जठराला गंभीर दुखापत झाली होती. तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करताना मोठा खर्च झाल्याने तो कर्जबाजारी झाला.

दरम्यान, २०२३ मध्ये एका गुन्ह्यात अटक झाल्यानंतर त्याला येरवडा कारागृहात ठेवण्यात आले. तेथे त्याची बेकायदेशीर शस्त्रविक्री करणाऱ्या एका आरोपीशी ओळख झाली. त्या आरोपीने त्याला मध्य प्रदेशातील कुख्यात शस्त्र पुरवठादार पप्पी सिंग याचा संपर्क क्रमांक दिला. गरज भासल्यास व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधण्याचा सल्लाही त्याने दिला.

जेलमधून सुटल्यानंतर शब्बीरने रिक्षा चालवण्यास सुरुवात केली. मात्र, उत्पन्न अपुरे पडत असल्याने आणि कर्जाचा बोजा वाढल्याने झटपट पैसा कमावण्यासाठी त्याने शस्त्र विक्रीचा व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. एक जून रोजी त्याने पप्पी सिंगशी संपर्क साधला. पिस्तुले खरेदी करण्यासाठी कर्वेनगर येथील एका व्यक्तीकडून ४० हजार रुपये व्याजाने घेतले. स्वतःकडील पैशांसह तो दुचाकीवरून नाशिक, धुळे मार्गे शिरपूर येथे पोहोचला. पप्पी सिंगने पाठविलेल्या लोकेशनवर गेल्यानंतर नंबर नसलेल्या दुचाकीवर आलेल्या एका तरुणाने चेहरा झाकून शब्बीरकडून ७५ हजार रुपये घेतले. त्याबदल्यात तीन गावठी पिस्तुले आणि सहा जिवंत काडतुसे त्याच्या ताब्यात दिली. हा शस्त्रसाठा घेऊन शब्बीर पुण्यात परतला.

### एक लाख ६६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

दरम्यान, गुरुवारी (दि. २५) सायंकाळी चारच्या सुमारास तो भोसरीतील गावजत्रा मैदान परिसरात ग्राहकाच्या शोधात आला होता. याची माहिती गुंडा विरोधी पथकाला मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला. एका पोलिसाला बनावट ग्राहक म्हणून आरोपीकडे पाठविण्यात आले. व्यवहार सुरू होताच पथकाने शब्बीरला ताब्यात घेतले. त्याच्याकडून तीन गावठी पिस्तुले, सहा जिवंत काडतुसे आणि अन्य साहित्य असा एकूण एक लाख ६६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे मध्य प्रदेशातून पुणे जिल्ह्यात होणाऱ्या बेकायदेशीर शस्त्रपुरवठ्याचा आणखी एक दुवा पोलिसांसमोर आला असून मुख्य पुरवठादार पप्पी सिंगचा शोध सुरू आहे.

# क्रीडा क्षेत्राला समर्पित चार दशकांची तपस्या

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या क्रीडा वैभवाचे शिल्पकार; क्रीडा अधिकारी शाम भोसले

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**"खेळाडू घडवणे म्हणजे देश घडवणे" हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून गेली चार दशके क्रीडा क्षेत्रासाठी अविरत झटणारे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे क्रीडा अधिकारी शाम भोसले येत्या 30 जून 2026 रोजी प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. संस्थेचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने सेवानिवृत्ती कार्यक्रम न करण्याचा मानस त्यांनी घेतला आहे. त्यांच्या या सेवापूर्ती निमित्त क्रीडा क्षेत्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.**



"सरांमुळे आमच्या विविध शाळेचे मैदान खऱ्या अर्थाने फुलले. प्रत्येक खेळाडूच्या अडचणी समजून घेऊन त्याला मदत करणे, हा त्यांचा स्वभाव," अशी भावना एका विविध शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य व मुख्याध्यापकांनी व्यक्त केली.

केवळ शासकीय पदावर काम करून न थांबता, भोसले सरांनी राज्यातील क्रीडा चळवळ बळकट करण्यासाठी मोठे योगदान दिले. 42 विनाअनुदानित खेळ संघटनांचे राज्य अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. शासनाचे अनुदान नसताना, स्वबळावर व लोकसहभागातून या संघटना चालवणे व खेळाडू घडवणे हे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले. यातून या खेळांना कायमस्वरूपी मान्यता सह अनुदान व क्रीडा गुण मिळवण्यासाठी त्याची अतोनात धडपड सुरू आहे व भविष्यात ही राहील.

ग्रामीण व शहरी भागातील दुर्लक्षित खेळ व खेळाडूंना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अनेक पारंपरिक क्रीडा प्रकारांना नवसंजीवनी देण्याचे श्रेय त्यांनाच जाते. "अनुदान नाही म्हणून खेळ थांबत नाहीत, जिद्द असेल तर मार्ग निघतोच," हा मंत्र त्यांनी संघटनांच्या कार्यकर्त्यांना दिला. शाम भोसले सरांची ओळख म्हणजे कडक शिस्तीचे पण मनाने हळवे अधिकारी. पहाटे 5 वाजता शाळांच्या मैदानावर हजर राहणारे सर, खेळाडूंच्या आहारापासून ते त्यांच्या सरावापर्यंत प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने लक्ष देत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल खेळाडूंना स्वतःच्या खिशातून मदत केल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यांच्या संपर्कात आलेला प्रत्येक खेळाडू आज त्यांना 'गुरू' मानतो.

सेवानिवृत्त होत असले तरी शाम भोसले सरांचे क्रीडा क्षेत्राशी असलेले नाते संपणार नाही. "माझी नोकरी संपली, पण क्रीडा सेवा संपणार नाही. जोवर श्वास आहे तोवर खेळाडू साठी मैदानावरच असेन," अशी ग्वाही ते देतात. निवृत्तीनंतर विनाअनुदानित क्रीडा संघटनांच्या माध्यमातून तळागाळातील खेळाडू घडवण्याचे काम अधिक जोमाने करण्याचा त्यांचा मानस आहे.

### पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या क्रीडा वैभवाचे शिल्पकार

शाम भोसले यांनी क्रीडा अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यापासून पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विविध शाळांना क्रीडा क्षेत्रात एक वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाच्या शेकडो विद्यार्थ्यांनी जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी केलेली आहे. कबड्डी, खो-खो, ॲथलेटिक्स, कुस्ती, व्हॉलीबॉलसारख्या मैदानी खेळांपासून ते बुद्धिबळ, कॅरमपर्यंत सर्वच खेळांसह फाईट गेम मध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

### क्रीडा क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव

शाम भोसले सरांच्या सेवानिवृत्तीनिमित्त राज्यभरातील क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक, खेळाडू आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या अनुभवाचा व मार्गदर्शनाचा लाभ क्रीडा क्षेत्राला पुढील अनेक वर्षे होत राहील, हा विश्वास सर्वांनी व्यक्त केला. यावेळी कार्यक्रमास प्रमुख उपस्थितीत पुणे जिल्हा शिक्षण मंडळ पुणे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, खजिनदार ॲड मोहनराव देशमुख, उपसचिव एल एम. पवार, परीक्षा विभाग व मुल्यमापन अधिकारी किरण देशपांडे अकौंटट गोरख सोंडकर सह क्रीडा प्रेमी उपस्थित होते.

---

## प्रियदर्शनी स्कूल येथे सीनियर केजी विद्यार्थ्यांचा 'ग्रीन डे' उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे आज सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांसाठी 'ग्रीन डे' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धन, निसर्गप्रेम आणि पावसाळ्याचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत आनंददायी पद्धतीने पोहोचविण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या निमित्ताने विद्यार्थ्यांनी हिरव्या रंगाचे आकर्षक पोशाख परिधान केले होते. शाळा हिरव्या रंगाच्या सजावटीने नटली होती. विद्यार्थ्यांनी झाडे, पाने, फुले, फळे तसेच पर्यावरण संरक्षणाशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

शिक्षकांनी वृक्षारोपणाचे महत्त्व, स्वच्छ पर्यावरणाचे फायदे तसेच पावसाळा हा निसर्गाला नवसंजीवनी देणारा ऋतू असल्याचे विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण व्हावी, झाडांचे संवर्धन करावे आणि निसर्गाशी मैत्री करावी हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

शाळेच्या व्यवस्थापनाने आणि मुख्याध्यापकांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, पर्यावरणप्रेम आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना विकसित होते, असे सांगत सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले.

## मोशी-चिखलीत वारंवार वीज खंडित; केबल बिघाडामुळे नागरिक हैराण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चिखली परिसरातील पिंगळेरोड, सोनवणेवस्ती परिसरात सातत्याने विजेचा लंपडाव सुरू आहे. तर मोरेवस्ती येथील राजगड पार्क परिसरातील गल्ली क्र. ५ मधील केबलमध्ये गुरुवारी (दि. २५) पुन्हा तांत्रिक बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित झाला.**



गेल्या महिनाभरात मोरेवस्ती परिसरात तब्बल चार वेळा भूमिगत वीज केबलमध्ये बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित झाला आहे.

मोरेवस्ती येथील अष्टविनायक चौक परिसरात १३ जून रोजी सुमारे १४ तास वीजपुरवठा खंडित झाला. त्यानंतर त्याच ठिकाणी लगेचच दोनच दिवसांनी केबलमध्ये बिघाड होऊन १५ तास वीजपुरवठा खंडित झाला. त्यानंतर आठ दिवसांनी पुन्हा राजगड पार्क येथे केबलमध्ये बिघाड होऊन १२ तासांपेक्षा अधिक काळ वीजपुरवठा खंडित झाला. त्यानंतर गुरुवारी (दि. २५) पुन्हा राजगड पार्क परिसरातील गल्ली क्र. ५ येथील केबलमध्ये बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित झाला.

केबलमध्ये बिघाड होण्याबरोबरच मोरे वस्ती, चिखली आदी परिसरात दररोजच अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होतो. त्यामुळे विजेची घरगुती उपकरणांमध्ये बिघाड होऊन जळाल्याच्या घटना घडत आहेत. या परिसरात केबलमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने केवळ दुरुस्ती करण्याऐवजी संपूर्ण जुनी केबल बदलणे आवश्यक बनले आहे.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station